वर्ष-०६ | अंक-५१ | मुंबई, मंगळवार १० ते १६ नोव्हेंबर-२०२० | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. डॉ. अश्विनी नाईक

PG 2 माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहिमेमुळे कोरोना रोखण्यात यश – मुख्यमंत्री

3 → सत्य आणि सोयीस्कर सत्य

फुटपाथवर झोपलेल्या 1 वर्षाच्या बालिकेचे अपहरण !...... ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## लवकरच बालविवाह नियमात सुधारणा होणार राज्यसरकार ने स्थापन केली समिती

### राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.



मुंबई, बालविवाह (प्रतिबंध) नियम 2008 मध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. त्यासंदर्भातील निर्देश महिला व बाल विकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी आज बैठकीत दिले.बालविवाह (प्रतिबंध) नियमामध्ये सुधारणा करण्याबाबत आयोजित बैठकीस महिला व बालविकास विभागाच्या सचिव आय. ए. कुंदन, महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ. ऋषिकेश यशोद, उपायुक्त रवी पाटील, उपायुक्त तथा बालसंरक्षण कार्यक्रम व्यवस्थापक श्रीमती मनिषा बिरासीस, युनिसेफच्या बालसंरक्षण तज्ज्ञ अल्पा वोरा आदी उपस्थित होते.मंत्री ॲड. ठाकुर म्हणाल्या, बालविवाह रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्य बालविवाह प्रतिबंध नियम 2008 ची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. मात्र, त्यासाठी नियमातील तरतुदींचा नव्याने आढावा घेत त्यातील त्रुटी काढण्यासह सुधारणा कराव्या लागतील. यासाठी ही समिती नेमण्यात नेमण्यात येत ...पान ४ वर...

## आमच्या सर्व वाचकांना हितचिंतकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

## मुंबईत फटाके फोडण्यास बंदी, पालिकेनं काढला आदेश




मुंबई, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यात फटाके फोडण्यावर बंदी घालता येणार नाही, असं स्पष्ट केले आहे. त्यानंतर आता मुंबई महापालिकेने मुंबईत सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास बंदी घातली आहे. जर कुणी उल्लंघन केल्यास साथरोग नियंत्रण कायदा 1897 अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. मुंबई महापालिकेनं एक परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या ...पान ४ वर...

## मालवणीत दोन पोलिसांवर हल्ला; गणवेश फाडला, मिरचीपूड फेकली




मुंबई : महिलेला अश्लील शिवीगाळ करणाऱ्या सराईत आरोपीला अडवणाऱ्या दोन पोलिसांवर त्याने आणि त्याच्या महिला साथीदाराने हल्ला चढवला. यात एकाचा गणवेश फाडण्यात आला असून त्यांच्या डोळ्यात मिरची पावडरही फेकण्यात आली. या प्रकरणी मालवणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. दीपक चौहान असे या हल्लेखोराचे नाव असून त्याची महिला साथीदार मीरा देवी हिलादेखील ताब्यात घेण्यात आले आहे. पोलीस नियंत्रण कक्षावर चित्रकला चौरसिया नामक महिलेने तक्रार केली होती. त्यानुसार पोलीस हवालदार अशोक चव्हाण आणि पोलीस नाईक देवकर हे बीट मार्शल घटनास्थळी दाखल झाले. ...पान ४ वर...

## क्युआर कोड स्कॅन करुन पैसे दिल्याचे भासवायचे, पण...



एखाद्या दुकानात जाऊन वस्तूची खरेदी करायची. त्यानंतर ऑनलाइन पेमेंट करतो, असे सांगून दुकानात लावण्यात आलेला क्युआर कोड स्कॅन करायचा व एका अँड्रॉइड ॲपचा वापर करत ऑनलाइन पेमेंट केल्याचा खोटा एसएमएस पाठवून लाखोंची फसवणूक करणाऱ्या टोळीचा नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी संजय अशोक सोनार, शुभम भगवान सोनवणे, रवी उत्तम पटेल, राजू श्रीहरीलाल गुप्ता ( सर्व रा. भोसरी, पुणे) या चार आरोपींना अटक केली आहे. या आरोपींकडून २ लाख ३६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक मनोज पाटील यांनी ही माहिती दिली. नगर-सोलापूर रोडवर सिद्धी पेट्रोल पंप येथे ८ नोव्हेंबरला एका कारमधून चार जण आले. त्यांनी या कारमध्ये तीन हजार रुपयांचे पेट्रोल भरले. तसेच ऑनलाइन पेमेंट करतो, असे सांगून पेट्रोल पंपावरील क्युआर कोड स्कॅन केला. त्यानंतर ऑनलाइन पेमेंट ...पान ४ वर...

## पार्टी सुरु असताना एपीएम-सीमधील हुक्का पार्लरवर छापा



नवी मुंबई : एपीएमसीमधील सतरा प्लाझा इमारतीमध्ये चालणाऱ्या हुक्का पार्लरवर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. छाप्या वेळी त्याठिकाणी मुला मुलींची जंगी पार्टी सुरु असल्याचे आढळून आले. याप्रकरणी हुक्का पार्लर मालकावर एपीएमसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत सुरु होते. एपीएमसी मधील सतरा प्लाझा हि व्यावसायिक इमारत त्याठिकाणी चालणाऱ्या हुक्का पार्लर मुळे शहरात चर्चेची ठरत आहे. कॅफेच्या नावाखाली त्याठिकाणी हुक्का पार्लर चालवले जात आहेत. त्यांच्याकडून तरुण तरुणींना आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या शक्कल लढवल्या जात असतात. अशातच शनिवारी संध्याकाळी तिथल्या पाम अटलांटिस ...पान ४ वर...

## शेतकऱ्यांची दिवाळी गोड, ठाकरे सरकारला 10 हजार कोटींचे पॅकेज वाटण्यास मंजुरी



मुंबई, विदर्भ पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा भागात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी 10 हजार कोटी रुपयांची मदत राज्य सरकारच्या वतीने जाहीर केली होती. आता हा मदतनिधी वाटप करण्यास निवडणूक आयोगाने ठाकरे सरकारला परवानगी दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची दिवाळी यंदा गोड जाणार आहे. परतीच्या पावसाने विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात धुमशान घातले होते. हातातोंडाशी आलेली पिकं पाण्यात वाहून गेली होती. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी नुकसानसग्रस्त भागाची पाहणी करून 10 हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली होती. परंतु,ही मदत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना थेट खात्यात मिळणार होती. पण तत्पूर्वी राज्यात शिक्षक आणि पदवीधर विधान परिषदेची निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्याने आचारसंहिता सुरू झाली आहे. या आचारसंहितेमुळे राज्य सरकार पहिल्या हप्त्यात चार हजार कोटी रुपये भलेही मंजूर केले असले तरी वास्तविक खात्यात देणे आचारसंहितेच्या नियमांमुळे अडचण झाले असल्याने राज्य सरकारच्या वतीने निवडणूक आयोगासोबत पत्रव्यवहार केले गेला होता. राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी याबाबत निवडणूक ...पान ४ वर...

## चोरी कशी केली सांगितले नाही म्हणून येरवड्यात कैद्यांमध्ये हाणामारी



पुणे: येरवडा येथील तात्पुरत्या कारागृहात कैद्यांमध्ये हाणामारीची घटना घडली आहे. चोरी कशी केली हे सांगितले नाही म्हणून, एका कैद्याने अन्य एका कैद्याला बेदम मारहाण केली. या प्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सत्वशील पाटील या कर्मचाऱ्याने तक्रार दिली आहे. यामध्ये सोहेल शेख हा न्यायालयीन कैदी जखमी झाला आहे.प्रेम हा खेळ नाही, पण या खेळात प्रेम आहे! आत्ता खेळण्यासाठी ५०० रु. मिळवापोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, करोनाच्या पार्श्वभूमीवर येरवडा येथे तात्पुरते कारागृह तयार करण्यात आले आहे. अटक केल्यानंतर न्यायालयीन कोठडी सुनावलेल्या कैद्यांना या तात्पुरत्या कारागृहात ठेवण्यात येते. आरोपी व शेख यांना देखील याच कारागृहात ठेवण्यात आले होते. त्यावेळी आरोपीने शेख याला 'तू चोरी कशी केली?' अशी विचारणा केली. त्यावर शेख याने त्याला सांगितले. त्याने पुन्हा विचारणा केल्यावर सांगितले नाही. त्यामुळे आरोपीने शेख याच्या डोक्यात थाळी घालून जखमी केले. या प्रकरणी येरवडा पोलीस अधिक तपास करत आहेत.

## हरवली आहे



**नाव : सरोज राकेश विश्वकर्मा**

वय : 36

दिनांक : 12/8/2020 रोजी बेपत्ता झाली आहे

कोणाला आढळल्यास नवघर पोलीस ठाणे येथे कळवावे

१) उंची - ५ फुट २इंच

२) रंग - गोरा

३) केस - काळे

४) डोळे - काळे

५) बांधा - मध्यम

६) नेसुस - गुलाबी रंगाची साडी

७) पायात चप्पल, उजव्या हातावर चंच्या आकाराचे गोंदलेले.

# माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहिमेमुळे कोरोना रोखण्यात यश – मुख्यमंत्री

माझे कुटुंब
माझी जबाबदारी

कोरोनाचा रूग्णसंख्या आणि मृत्यूदर दिवसेंदिवस कमी होत आहे. असं असलं तरी या बाबत गाफिल राहून चालणार नाही. युरोप प्रमाणे कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा मुकाबला करण्याची तयारी असू द्या असं मुख्यमंत्री म्हणाले आहे. माझे कुटुंब, माझी जवाबदारी या मोहिमेमुळे आपण कोरोना संसर्ग रोखण्यात काही प्रमाणात यशस्वी झालो आहेत. डिसेंबर महिन्यात ही मोहिम परिणामताकपणे राबविण्याचे नियजोन करण्याच्या सुचना प्रशासनाने दिल्या आहेत. दिवाळीनंतरचे १५ दिवस हे जागरूकतेचे असतील त्यासाठी या आखून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करा.कोरोनाच्या पार्श्वभूमिवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हा अधिकाऱ्याशी व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे बैठक घेतली. यात मुख्यमंत्र्यांनी कोरोना संदर्भातल्या उपाययोजनांची माहिती दिली. या बैठकीत आरोग्य मंत्री राजेश टोपे,मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार डॉ.दिपक म्हैसेकर त्याचबरोबर मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे आणि टास्क फोर्सचे डॉक्टर्सही सहभागी झाले होते. मुख्यमंत्री या वेळी म्हणाले की,हे वर्ल्ड वॉर आहे असे मी मार्च महिन्यात म्हणालो होतो. इतक्या महिन्यांमध्ये आपण हत्यार नसतानासुद्धा विषाणूवर काबू मिळविण्यासाठी लढलो. त्यामुळे आपल्याला यश येते आहे असं दिसत आहे. या विषाणूचा जेव्हा चंचूप्रवेश झाला तेव्हा आपण लॉकडाऊन केले आणि आता हळूहळू सर्व खुले करतो आहोत. सुरुवातीच्या काळात विषाणूची ठिकाण मर्यादित होती. शहरांत असलेला संसर्ग आता राज्यभर सर्वत्र पसरलाय. ग्रामीण भागात सुद्धा रुग्ण सापडत आहेत. या सर्व कालावधीत उन्हाळा आणि पावसाळ्यात मोसमी आजार आढळले नाहीत. कारण आपण आरोग्यविषयक योग्य खबरदारी पाळली होती. मात्र आत्ता थंडी सुरू झाली आहे. या काळात कोविड व्यतिरिक्त इतर आजारही उफाळून येतात. विशेषत: हृदयविकार, न्युमोनिया, अस्थमा, फ्ल्यू सारखे आजार आपली डोकी वर काढतात.त्यामुळे रुग्णांनी आता अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.बैठकीत बोलताना मुख्यमंत्र्यांनी सुपर स्प्रेडच्या चाचण्या करणं आवश्यक असल्याचं म्हटलं आहे. जास्त लोकांच्या संपर्कात येणारे बस चालक तसेच सार्वजनिक व्यवस्थेतील कर्मचारी हे सुपर स्प्रेडर्स असू शकतात. त्यामुळे त्यांनी लगेचच या चाचण्या करून घेण्याच्या सुचना दिल्या आहेत. सध्या फिल्ड हॉस्पिटल किंवा कोविड केअर केंद्राच्या उभारण्यात आलेल्या सुविधा काढून टाकू नका. आपल्याला थोडा वेळ मिळाल आहे त्यामुळे काही उणीवा असतील त्या दूर करण्याचा प्रयत्न करा. वैद्यकीय यंत्रणेला प्रशिक्षित करा, विभागवार डॉक्टर्सची आढावा घ्या त्याचप्रमाणे कर्मचारी कमी करू नका थोडी विश्रांती घेऊन तात्पुरत्या सुविधा कायमस्वरूपी होतील का हे पहा असंही बैठकीदरम्याम मुख्यमंत्री म्हणाले.कोरोनाच्या पार्श्वभूनमिवर नियमांचे काटेकोरपणे पालन करा. मास्क न वापरणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे प्रार्थनास्थळे उघडण्याबाबत दिवाळीनंतर निर्णय घेण्यात येईल,असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे.आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनीही संवाद साधला. आज आपल्याकडे ५०० प्रयोगाशाळा असताना चाचण्या देखील वाढल्या पाहिजेत. काही जिल्ह्यांत एंटीजेनच्या ऐवजी आरटीपीसीआर चाचण्यांवर अधिक भर द्यावा लागेल. गृह विलगीकरणमध्ये असलेल्या रुग्णांकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. काही जिल्ह्यात अजून मृत्यू दर जास्त आहे त्यामुळे प्रशिक्षित आयसीयू कर्मचारी असणे गरजेचे आहे असं आरोग्यमंत्री म्हणाले.

माझे कुटुंब, माझी जबाबदारी मुळे राज्यात ५० हजारपेक्षा जास्त कोविड रुग्ण आढळले आहेत शिवाय सह व्याधी रोग्यांची माहिती पण शासनाकडे आहे. त्यावर अधिक लक्ष केंद्रित करून कोरोना संसर्ग त्यांना होऊ नये म्हणून विशेष काळजी घेण्यात येईल. नंदुरबारसारख्या दूरच्या जिल्ह्यात देखील मोबाईल एपचा चांगला वापर करून माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहीम राबविण्यात आली दुसरी लाट आली तर ४० टक्के रुग्ण विलगीकरणात तर ४५ टक्के कोविड केंद्रात असतील तर १५ टक्के रुग्णांना आयसीयूची गरज असेल अशी अपेक्षा आहे. आजमितीस केवळ १ लाख सक्रीय रुग्ण असून दररोज २४ हजार रुग्ण असायचे तिथे आता ५ ते ६ हजार रुग्ण आढळत आहेत. रिकव्हरी रेट ९१ टक्के इतका आहे अशी माहितीही त्यांनी दिली.–

**डॉ प्रदीप व्यास, मुख्यमंत्री आरोग्य प्रधान सचिव**

'माझे कुटुंब, माझी जबाबदारी यामध्ये आपल्याकडे डेटा जमा झाला आहे, त्याचा वैद्यकीय कारणांसाठी चांगला उपयोग करून घेता येईल'– संजय कुमार, मुख्य सचिव'शासकीय कार्यालयांत गर्दी मोठ्या प्रमाणावर दिसत असून अशी ठिकाणी सुपर स्प्रेडर ठरू शकतात. त्यामुळे याठिकाणी नाविन्यपूर्ण कल्पना राबवून गर्दी होऊ देऊ नका. शहरांत रस्त्यावर खाद्य विक्रेते , उपहारगृहे यांत गर्दी वाढू लागली आहे तिथेही नियम पाळण्याची गरज आहे'.

**– अजोय मेहता, मुख्यमंत्री प्रधान सल्लागार**

'गडचिरोलीत रुग्ण संख्या सप्टेंबरच्या तुलनेत ऑक्टोबरमध्ये दुप्पट झाली आहे . नंदुरबार आणि धुळे येथे अधिक चाचण्या वाढणे गरजेचे आहे. दिल्लीत कोविडची परिस्थिती हवेच्या प्रदुषणामुळे वाढली आहे त्यामुळे संसर्ग वाढला आहे'.

**– डॉ दीपक म्हैसेकर, मुख्यमंत्री सल्लागार**

'साधारण ९ महिने झाले कोविडशी लढाई सुरु आहे. अनेक निकषांवर चांगली कामगिरी होत आहे पण आता अधिक आव्हाने आहेत. युरोपात दुसऱ्या लाटेची सुरुवात झाली असून दिल्ली व इतर काही राज्यांत देखील दुसऱ्या लाटेची भीती वाटते आहे अशा परिस्थितीत आपण पुढील काळातले नियोजन केले पाहिजे'

**– सचिव सीताराम कुंटे, अतिरिक्त मुख्य**

'दुसरी लाट कधी येईल याविषयी चर्चा सुरु आहे . हिवाळयात जिथे जिथे तापमान कमी झाले तिथे, तसेच औद्योगिक भागात कोरोना वाढू शकतो. चाचण्या अधिक वाढविणे तसेच रुग्णांचे जास्तीत जास्त संपर्क शोधणे गरजेचे आहे'

**– डॉ शशांक जोशी, टास्क फोर्सचे डॉक्टर**

# "पोलीसांवर हात उचलणाऱ्यां गुन्हेगारावर शासनाने कडक कारवाई करावी"

मार्च २०२० पासून राज्यात ३७८ ठिकाणी पोलीसांवर हात उगारला गेला व त्यात ९० पोलीसकर्मी जखमी झाले अशा घटनांचा सर्व सामान्य जनतेने निषेध केला पाहिजे.नवी मुंबईत जेवणाची पार्सले पोहचवणाऱ्या बाईने पोलीसाला शिवीगाळ केली होती , असे निंदनीय प्रकार थांबविण्यासाठी समाजातील सर्व स्तरातील लोकांनी प्रयत्न करावेत. तसेच मुंबईत सादविका तिवारी व मोहसीन खान यांनी एकनाथ पारठे या पोलीसाची कॉलर पकडून मारहाण व शिवीगाळ केली अशा घटना का घडतात.विशेषत: अमराठी भाषिक परप्रांतीय लोक मराठी पोलीसांच्या वर हात उचलतात , ते हिंमतच कशी करतात ? मुळातच पोलीसांवर हात उचलणे चुकीचे आहे. अशा लोकांवर पोलीसांनी कडक कारवाई करावी. सर्वसामान्य मराठी माणसे पोलीसांबद्दल आदर बाळगतात; तर बाहेरुन येऊन दादागिरी करणारे कायद्याच्या रक्षकाचा चारचौघात अपमान करून मारहाण करतात, समाजातील सर्व स्तरातील लोकांनी अशा घटनांचा विरोध केला पाहिजे. एवढे होऊनही संयम बाळगल्याबद्दल प्रमाणपत्र व रोख रक्कमेचे पारितोषिक देऊन मुंबई पोलीस आयुक्त एकनाथ पारठे यांचा सन्मान करतात ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. कारण यामुळे पोलीसकर्मींचे मनोबल वाढेल यात मुळीच शंका नाही. सर्वसामान्य नागरिकांनी सदैव पोलीसांचा आदर करायला हवा. तसेच पुण्यातील पिंपरी चिंचवड मध्ये एका कर्तव्यदक्ष वाहतूक पोलीसाने मास्क न लावण्याऱ्या वाहनचालकाला हटकले असता त्याने रागाने चारचाकी कारच्या बोनेटवर बसवून त्या वहातूक पोलीसाला एक किलो मीटर सुसाट वेगाने भरधाव दूर नेले. त्यामुळे सायंकाळच्या सुमारास रस्त्यावर वहातूक जाम झाली. जर आपलेच रक्षण करण्यासाठी तैनात करण्यात आलेल्या पोलीसांच्या बरोबर नागरिक असे वागू लागले , त्यांना मारहाण करून अपमान करू लागले तर पोलीस कर्तव्य कसे बजावणार ?

सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याबद्दल पोलीस प्रशासनाने पोलीसांवर हात उचलणाऱ्यां वर कडक कारवाई करावी , आणि गुन्हेगाराला चांगले वठणीवर आणण्यासाठी अशा गुन्हेगाराला कोणीही पाठीशी घालू नये. तसेच अशा प्रकरणात गुन्हेगारांवर कायदेशीर कडक कारवाई करा आणि त्यांना अद्दल घडवा. त्यामुळे पुढील काळात अशा निंदनीय घटना घडणार नाहीत. सर्व नागरिकांनी कर्तव्यदक्ष पोलीसांच्या कार्याचा सदैव सन्मान करून त्यांना संपूर्ण सहकार्य करणे आवश्यक आहे.

# पैशाचा आमिष दाखवून सामान्य जनतेला लुबाडणाऱ्या आरोपींना कासा पोलीस ठाण्याने कमी वेळात केली अटक

पैशाचा पाऊस पाडून तो डबल करून देतो, असे आमिष दाखवून जंगलात घेऊन त्यावर तंत्र-मंत्र करून सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक करून पैसे घेऊन हे आरोपी मोकाट होतात.अशीच घटना पालघर येथील कासा येथे झाली. सुरेश काकड, रमण भवर, कमलाकर वाघ आणि प्रमोद भांमरे यांनी आपसात संगणमत करून वाटी येथे राहणारे निरप विश्वकर्मा याला पैसे डबल करून देऊ असे आमिष दाखवून जंगलात घेऊन गेले आणि पैसे डबल करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले.दिनांक. १५/१०/२०२० रोजी निरप विश्वकर्मा हा २,४०,०००/- रुपये घेऊन आरोपींकडे गेला. या आरोपींनी निरप विश्वकर्माला जंगलात नेऊन त्याचे डोळे बंद करून बसवली आणि मंत्र करून पैसे डबल करून देतो असे सांगून पैशाची बॅग घेऊन पळाले .निरप विश्वकर्मानि तात्काळ कासा पोलीस ठाण्यात जाऊन झालेल्या संपूर्ण घटनेची दखल पोलीसांना दिली आणि आरोपी विरुद्ध तक्रार दाखल केलीआरोपी सुरेश काकड आणि रमन भवरला कासा पोलीस ठाण्याकडून तात्काळ अटक करण्यात आली आणि पुढील आरोपीचा तपास पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र ठाकूर हे करीत आहेतत्यामुळे अशा अंधश्रद्धेला बळी न पडता अशा कोणत्याही प्रकारच्या घटना निदर्शनास आल्यास तात्काळ आपल्या जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा असे आव्हान पालघर जिल्ह्यातील नागरिकांना पोलीस अधीक्षक श्री.दत्तात्रय शिंदे यांनी दिले आहे.

# हत्या की आत्महत्या? एकाच घरातील 5 जणांचा संशयास्पद मृत्यू, परिसरात खळबळ



नवी दिल्ली - देशात कोरोनाचा कहर पाहायला मिळत असतानाच अनेक धक्कादायक घटना समोर येत आहेत. परिस्थितीला कंटाळून काही जणांनी टोकाचं पाऊल उचल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. याच दरम्यान एकाच घरातील 5 जणांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची भयंकर घटना घडली आहे. घरामध्ये पाच जणांचे मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पश्चिम बंगालच्या दक्षिण दिनाजपूर जिल्ह्यामधील गावात ही धक्कादायक घटना घडली आहे. एकाच घरातील पाच जणांचे मृतदेह संशयास्पद पद्धतीने सापडल्यामुळे हत्या की आत्महत्या याचा सध्या तपास सुरू आहे. या मृत्यू प्रकरणामुळे पश्चिम बंगाल हादरलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृत्यू झालेल्यांमध्ये दोन लहान मुलं आणि दोन महिलांचा समावेश आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. जालपूर गावातील एका घरात पाच जणांचे मृतदेह मिळाले. एका व्यक्तीचा मृतदेह हा गळफास घेतलेल्या अवस्थेत होता. तर इतर व्यक्तींच्या डोक्यावर जखम असलेली पाहायला मिळाल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. पोलिसांनी आत्महत्या नसून हत्या असल्याचा प्राथमिक संशय व्यक्त केला आहे. एकंदरी घरातील अवस्था आणि मृतदेह पाहून पाचही जणांची हत्या झाल्याचं म्हटलं आहे. पोलिसांनी पाचही मृतदेह ताब्यात घेतले असून शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे. याआधी काही दिवसांपूर्वी गुजरातच्या अहमदाबादमध्ये देखील एकाच कुटुंबातील सहा जणांचे मृतदेह सापडले होते. सहा जणांनी सामूहिक आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता.

## पृष्ठ १ वरुन

### लवकरच बालविवाह नियमात

आहे. समितीने नियमामध्ये आवश्यक ते बदल याबाबत अभ्यास करुन सुधारित नियमाचा मसुदा तातडीने शासनास सादर करावा, असे निर्देशही त्यांनी यावेळी
दिले.राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा ॲड. निर्मला सामंत-प्रभावळकर यांच्या अध्यक्षतेखाली ही 10 सदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे. या समितीमध्ये श्रीमती रमा सरोद, डॉ.आशा बाजपेयी, डॉ.जया सागडे, 'मासूम'च्या संस्था संचालक डॉ.मनिषा गुप्ते, विधायक भारतीचे संतोष शिंदे, सोशल बिहेव्हेर चेंज कम्युनिकेशन निशिध कुमार, युनिसेफच्या अल्पा वोरा, उपायुक्त (बालविकास) रवी पाटील, जिल्हा बालसंरक्षण अधिकारी (बुलढाणा) दिवेश मराठे हे सदस्य या समितीमध्ये आहेत.

### मुंबईत फटाके फोडण्यास

पत्रकानुसार, शहरात सार्वजनिक ठिकाणी मोठे फटाके फोडण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. कुठल्याही हॉटेल, क्लब, जिमखाना, संस्था, मैदान यांच्या आवारात फटाके फोडण्यास बंदी लागू करण्यात आली आहे. फक्त घराच्या, इमारतीच्या आवारात 14 नोव्हेंबरला लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सौम्य स्वरूपाचे फटाके फोडत येणार आहे. सौम्य स्वरुपाचे फटाके फोडण्यास परवानगी देण्यात आली असली तरी नागरिकांना खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. सॅनिटायझर हे ज्वलनशील असल्यामुळे दिवे लावताना किंवा फटाके फोडत असताना हाताला सॅनिटायझर लावू नये, असं आवाहनही पालिकेनं केले आहे. तसंच, फटाके फोडत असताना सॅनिटाझरची बाटली सोबत बाळगू नये, असं आवाहनही करण्यात आले आहे. सॅनिटायझर ऐवजी हात धुण्यासाठी साबनाचा वापर करा, असा पर्यायही पालिकेनं सूचवला आहे. जर सार्वजनिक ठिकाणी कुणी फटाके फोडता आढळलं तर साथरोज नियंत्रण कायदा 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 आणि नियमभंगाच्या दृष्टीने लागू असणारे कायदे व अनुषंगिक नियम अन्वये कडक कारवाई करण्याचे निर्देश पालिकेनं दिले आहे. मुंबईत फटाकेबंदीच्या निर्णयामुळे फटाके विक्रेत्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. दरवर्षी मरिन ड्राईव्ह परिसरात फटाकेबाजी करण्यात असते, यंदा मात्र, पालिकेच्या आदेशामुळे फटाकेबंदी रद्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्रात फटाके बंदी नाही, मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंची घोषणा

'गेल्या सात महिन्यांपासून लढा देऊन परिस्थिती आटोक्यात आली आहे. त्यामुळे चार दिवसांच्या धुरात हे वाहून जाता कामा नये, प्रदूषण टाळण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्याचे टाळा, शक्यतो फटाके फोडूच नये. फटाके फोडले नाही तर उत्तमच आहे. दिवाळीतील चार महिने हे अत्यंत महत्त्वाचे आहे. फटाकेवर बंदी आणली जाणार नाही. त्यामुळे सर्वांनी खबरदारी घेऊन फटाके फोडू नये, असं आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी केली.

### मालवणीत दोन पोलिसांवर हल्ला;

त्या वेळी चौरसियाला चौहान अश्लील भाषेत शिवीगाळ करीत होता. पोलिसांनी त्याला जाब विचारला तेव्हा त्यांच्याशी हुज्जत घालत त्याने झटापट करण्यास सुरुवात केली. देवकर यांच्या गणवेशाच्या शर्टाचा खिसा फाडला. तसेच मीरा देवीने चव्हाण व देवकर यांच्या डोळयात मिरची पावडर फेकली. त्यात त्यांना दुखापत झाली आहे. जमा झालेल्यांच्या दिशेनेही दीपकने चाकू उगारून त्यांना ठार मारण्याची धमकी दिली. “आम्ही आरोपींना अटक केली असून त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल,” असे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

### क्युआर कोड स्कॅन

झाल्याचा मेसेज पेट्रोल पंपावर असणाऱ्या व्यवस्थापकाला दाखवला. त्यानंतर हे चौघे भरधाव कारमधून निघून गेले. पेट्रोल पंपावरील व्यवस्थापक प्रमोद खरे यांनी पेट्रोल पंपाचे खाते चेक केले असता, तीन हजार रुपये जमा झाले नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. संबंधित कारमधील व्यक्तीने खोटा एसएमएस दाखवून फसवणूक केल्याचे लक्षात येताच, व्यवस्थापक खरे यांनी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार भिंगार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिशिरकुमार देशमुख यांना माहिती मिळाली की, 'दरेवाडी शिवारात संबंधित गुन्ह्यातील आरोपी फिरत आहेत. या माहितीची खात्री करत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दरेवाडी परिसरात गेले.

### पार्टी सुरु असताना

या हुक्का पार्लर मध्ये मोठी पार्टी सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र बुधवंत यांच्या पथकाने संध्याकाळच्या सुमारास त्याठिकाणी छापा टाकला. यावेळी शंभर हुन अधिक तरुण तरुणी हुक्का पार्टी करताना आढळून आले. त्या सर्वांना ताब्यात घेण्यात आले आहे. सोशल मिडियाद्वारे या पार्टीचे निमंत्रण देण्यात आले होते. तर हुक्का पार्लर चालक विरोधात एपीएमसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम रात्री उशीर पर्यंत सुरु होते. या कारवाईने सतरा प्लाझा मध्ये चालणारे अवैध धंदे पुन्हा एकदा उघडकीस आले आहेत. त्याठिकाणी यापूर्वी देखील अनेकदा कारवाया झालेल्या आहेत. यानंतरही अवैध धंद्यांना आळा बसू शकलेला नाही.

### शेतकऱ्यांची दिवाळी गोड

आयोगाला आचारसंहितेमध्ये निधी वाटपात अडचण येऊ नये, त्यास मंजुरी द्यावीस अशा आशयाचे पत्र पाठवले होते. अखेर आज निवडणूक आयोगाने राज्य सरकारला पत्र पाठवून निधी वितरीत करण्यास हरकत नसल्याचं म्हटलं आहे.

निवडणूक आयोगाच्या या भूमिकेमुळे शेतकऱ्यांना मदत देणे शक्य आहे. दिवाळीआधी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात साधारण: 4 हजार कोटी रुपयांची मदत दिली जाणार आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. दरम्यान, जून ते ऑक्टोबर या कालावधीत विविध जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी व पुरामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी नुकसान भरपाईच्या पहिल्या हप्त्यापोटी 2 हजार 297 कोटी 6 लाख 37 हजार रुपयांचा निधी वितरीत करण्याचा आदेश आज काढण्यात आला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या पूरग्रस्त भागाचा दौरा करून 10 हजार कोटींची नुकसान भरपाई देण्यात येईल असे जाहीर केले होते, त्यानुसार पहिल्या टप्प्यातील मदत लगेच वितरीत करण्यात येणार आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रभाग कार्यालय क्र. ५**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार

**// नोटीस //**

सर्व संबधितांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर वसुली अंतर्गत **रूम नं.५०१, बिल्डींग ए१५, शांति विहार कॉ.ओ.हौ.सो.,ए/१३/१४/१५, मीरारोड पूर्व, ठाणे ४०११०७** येथील मनपा मालमत्ता क्रमांक **ई१२००३०८९९०९१** ही मालमत्ता महानगरपालिका दप्तरी **अवंतीका जी. कोटनकर** यांचे नावावर आहे. परंतु त्यांचा मृत्यु दि. ३०/०८/२०१७ रोजी झाला. त्यामुळे सदर मालमत्ता **मुलगा** या नात्याने **सुहास कुमार जी. कोटनकर** यांनी महानगरपालिका कडे अर्ज करुन मालमत्ता नावे करणेकरीता मागणी केलेली आहे. तरी सदर मालमत्तेबाबत कोणतीही हरकत / अगर तक्रार असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांचे कार्यालयात लेखी आवश्यक कागदपत्रासह सादर करावी. मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही. यांची संबधितांनि नोंद घ्यावी.

सही
प्रभाग अधिकारी
**प्रभाग समिती कार्यालय क्र.५**
मिरा भाईंदर महानगरपालिका

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार १० ते १६ नोव्हेंबर-२०२०


## संपादकीय...



# सत्य आणि सोयीस्कर सत्य

अर्णव गोस्वामी यांना बुधवारी झालेली अटक, अटकेच्या वेळी घडलेले बहारदार नाट्य, त्या नाट्यानंतर समाजमाध्यमांवर व्यक्त झालेली मते आणि राजकीय नेत्यांच्या टोकाच्या प्रतिक्रिया, यांतून बदलत्या काळाचा पोत आपल्याला कळतो. बुधवारी आणि गुरुवारी अर्णव गोस्वामी यांच्या संदर्भात घडलेल्या घटना, अनेक प्रकारांनी काळजी वाटाव्या अशा आहेत. यातून माध्यमांचे अपरिपक्व रूप जसे समोर आले; तसेच राजकीय पक्षांचा आणि सरकारचाही बालिशपणा दिसून आला. कोणत्याही प्रकारच्या सत्तेचा गैरवापर, अखेर याच वाटेने जात असतो. सरकारवर माध्यमांनी अंकुश ठेवणे अपेक्षित असते, त्या अर्थाने प्रसारमाध्यमांची जबाबदारीही मोठी आहे; मात्र त्याआधी त्यांनीही स्वतःचे पावित्र्य राखण्याची गरज असते. आपल्याला सर्व माफ आहे अशी भावना कोणाचीही असू नये. 'कायदा सर्वतोपरी आहे आणि कायद्यानुसार जे काही घडेल, ते आपण स्वीकारले पाहिजे,' या उच्चारांची जपमाळ आजही सतत ओढली जात असते; परंतु आपल्याला जी बाजू योग्य वाटते, तीच कायद्यालाही योग्य वाटली पाहिजे आणि तीच सर्वांनी स्वीकारली पाहिजे, असा हट्ट किंवा हेका धरणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढत आहे. पत्रकारिता, राजकारण आणि समाजमन या तिन्ही स्तरांवर याच भावनेची घट्ट पकड आज दिसून येते. वास्तवाच्या भिंगातून घटनांकडे पाहण्याचे आपण पूर्णपणे विसरून गेलो आहोत आणि प्रत्येक घटनेकडे राजकीय मतप्रदर्शनाची संधी म्हणूनच पाहण्याची खोड आपल्याला लागलेली आहे. ही परिस्थिती येण्यास राजकीय पक्ष आणि नेते, प्रसार माध्यमे; तसेच समाजमाध्यमे, हे सर्व घटक सारखेच कारणीभूत आहेत. सुशांतसिंह राजपूत प्रकरणी, सत्याचा शोध दुय्यम ठरला आणि हे प्रकरण हाताशी धरून राजकीय विरोधकांना कात्रजचा घाट दाखवण्याचे प्रयत्न सुरू झाले, तर अर्णव गोस्वामींच्या अटकेबाबतही तेच म्हणावे अशी स्थिती आहे. तसे पाहिले, तर एखादी वाहिनी आणि महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्याचे शासन यांच्या ताकदीची तुलनाच होऊ शकत नाही. कोणाला किती महत्त्व द्यायचे, हे ठरवण्याइतपत भान सरकारला असायला हवे. अभिनेत्री कंगनावरील कारवाईबाबत आणि अर्णव प्रकरणीदेखील शासनाचे; तसेच अर्णव यांना पाठीशी घालणारांचे हे भान सुटले; त्यामुळेच ज्या घटनेच्या संदर्भात ही अटक झाली, ती पूर्णपणे बाजूलाच राहिली. ज्या सरकारच्या कार्यकाळात गोस्वामींच्या चौकशीची फाइल बंद केली गेली, त्यांचे पाठीराखे आणि ज्या सरकारच्या कार्यकाळात गोस्वामी यांना अटक झाली, त्यांचे समर्थक या दोन गटांतच हमरीतुमरी सुरू झाली आहे.'न्याय-अन्यायाला जात, धर्म, प्रांत नसतो' हा आदर्शवाद आज बाळबोध ठरतो आहे आणि बिहारी अथवा मराठी भाषिक म्हणून न्याय मागितला जातो आहे. राजकीय सत्तेचा वापर कसा व कशासाठी करावयाचा असतो, याचे नवे धडे आपण सध्या राज्यात आणि देशभरही गिरवत असून, एका अलिखित नव्या घटनेचा स्वीकार सर्वांनीच केला आहे की काय, असे वाटू लागले आहे. हाथरसमध्ये राजकीय-प्रशासकीय अतिरेकापाठोपाठ, माध्यमांच्या अविचारी धाडसी पत्रकारितेचाही अतिरेक आपण पाहिला. एखाद्या गुंडाचे एन्काउंटर होते, तेव्हा 'यांना याच मार्गाने धडा शिकवला पाहिजे' म्हणत टाळ्या वाजवताना, ही पद्धत रूढ झाली, तर ती प्रत्येक वेळी गुंडाचाच खात्मा करण्यासाठी वापरली जाईल याची शाश्वती नसते, याचा आपल्याला सहज विसर पडतो. लोकशाहीच्या चौथ्या खांबाला खांद्याचा टेकू कधी द्यायचा आणि त्यावर लत्ताप्रहार कधी करायचा, याची गणिते राजकीय लाभाच्या गुणाकार-भागाकारावर ठरतात. लोकशाहीच्या एखाद्या खांबावर प्रहार झाला, तर त्यातून जनता जनार्दनाचा नरसिंहावतार प्रकट होईल आणि लोकशाहीच्या शत्रूचा नाश करील, अशी स्थितीही आता राहिलेली नाही; कारण समाजमाध्यमांनी या जनता जनार्दनाच्या आत लपून बसलेले भेदाभेदांचे अमंगळ प्रवाह मुक्तपणे वाहते केले आहेत. 'एक लाकूड हातांनी वाकवले, तर त्याचे दोन तुकडे होतात, सात लाकडांची मोळी बांधली, तर ती तुटता तुटत नाही,' ही एकीची बाळबोध व्याख्या विस्मरणात गेल्यावर, 'मी तुटेन; पण तुझ्यासोबत येणार नाही,' हेच भागधेय उरते, हे आपण लक्षात घेत नाही. या स्थितीत कोणाचीही बाजू घेण्यापेक्षा सत्याची बाजू घेणे आणि कायद्याला त्याचे काम प्रामाणिकपणे करू देणे, हे अधिक महत्त्वाचे आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.अन्वय नाईक आणि त्यांच्या मातोश्री यांनी आत्महत्या केली हे सत्य आहे, त्यांनी लिहून ठेवलेल्या चिठ्ठीत अर्णव यांच्यासह तिघांची नावे आणि आर्थिक कारणे लिहिली होती, हेही वास्तव आहे. आधीच्या सरकारने या प्रकरणाची फाइल बंद केली होती, तेव्हापासूनच नाईक यांच्या पत्नी आणि कन्या हा तपास पुन्हा सुरू व्हावा अशी मागणी करत होत्या. आता ती केस पुन्हा सुरू झाल्यावर आणि अर्णव यांना अटक झाल्यावर, ती राजकीय असल्याचा आक्षेप घेणारे, तपास बंद करण्याचा निर्णय अराजकीय होता, असे छातीठोकपणे सांगू शकतील का? सत्य ही जशी नेहमीच आपली ताकद बनते, तशी सोयीस्कर सत्य ही आपली अडचण बनते, याचा विचार दोन्ही बाजूंनी होणे आवश्यक ठरते. राज्य शासनाचा गाडा हाकताना, सूडभावनेने कारवाई करणे समर्थनीय नाहीच आणि ते केंद्रापासून राज्यापर्यंत सर्वांनाच लागू होते. टीका सहन करण्याची तयारी, टीकेला योग्य भाषेत उत्तर देण्याची तयारी आणि कोणी कितीही उचकवले, तरी आपण पक्ष संघटना चालवत नसून सरकार चालवत आहोत, याचे भान ठेवण्याच्या वृत्तीचा अभाव, यातूनच आजचे बरेचसे संघर्ष जन्माला आले आहेत. यालाच बहुधा 'न्यू नॉर्मल' म्हणत असावेत!

# संस्कृतीशी धर्मयुद्ध

***धर्माच्या कडेकोट बंदोबस्तात मिळणारी सुरक्षितता आधुनिकपूर्व काळातील समूहांना सुखावणारी होतीच, पण भारतीयांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण आता राज्यघटना करते..व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच तांत्रिकदृष्ट्या कायदेशीर ठरवता येईलही; पण सांस्कृतिक प्रगतीला त्यातून नकार मिळेल..***



समाज म्हणून माणूस एकत्रित राहू लागल्यानंतर माणसांच्या आहारविहाराचे नियमन करण्याची कल्पना पुढे आली. कोणी कसे वागावे, कोणी कसे बोलावे, कोणी काय खावे, कोणी कोणाशी विवाह करावा या पद्धतीचे नियम रूढी म्हणून सर्वमान्य झाल्याचे समजण्यात येऊ लागले. एका अर्थाने हे विचाराऐवजी विश्वासच केवळ महत्त्वाचा मानणारे समाजाच्या त्या-त्या वेळच्या वैचारिक घडणीशी हे नियम सुसंगत नसले, तर संघर्ष निर्माण होतो. याच समाजातील काहींना असे नीतीनियम हे बेडय़ा वाटतात. त्यांच्या अभिव्यक्तीला, आचार विचाराला, स्वायत्ततेला खीळ घालणारे वाटू लागतात. हा संघर्ष आधी मूठभरांचा त्रागा भासेल, पण त्यातूनच नव समाजरचनेचा उदय होतो. बदल काळाच्या ओघात संथपणे घडत राहतात. समाज त्यांना अप्रत्यक्षपणे मान्यता देत राहतो आणि त्यातून नव्या रचनेला संधी मिळते. मानवी समाजातील या चालीरीतींचे कधी सामाजिक संकेत होतात, तर कधी कायदे. ते त्या त्या परिसरातील समूहासाठी असतात. त्यात बदल कसा घडतो, तो कोणा सत्तेमुळे घडू शकतो का? धर्म, जात या चौकटी भेदणारा आधुनिक काळ पुन्हा धर्मभेदांच्या आश्रयाला कसा जातो, हे प्रश्न हळूहळू टोकदार होत आहेत.धर्माच्या कडेकोट बंदोबस्तात मिळणारी सुरक्षितता आधुनिकपूर्व काळातील समूहांना सुखावणारी होती, हे खरे. परंतु त्यालाही अंतर्गत विरोध होत राहणे हे मानवाच्या ठायी वृद्धिंगत होत असलेल्या बुद्धीमुळे स्वाभाविकच. त्यामुळेच धर्माने आखून दिलेल्या चौकटी आतून मोठय़ा करण्याचे काम अनेक धुरिणांनी केले. त्यांच्या हयातीत, बहुसंख्येने असलेल्या अन्यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली. त्यांना वाळीतही टाकले. परंतु काळाच्या प्रत्येक टप्प्यावर असे धुरीण निपजत राहिले आणि सामाजिक सुधारणांची लढाई चालूच राहिली. अलाहाबाद उच्च न्यायालयाने विवाहासंबंधाने नुकत्याच दिलेल्या निवाडय़ात केवळ विवाहासाठी धर्म बदलणे अयोग्य ठरवले आहे. आजवर सांस्कृतिक उत्कर्षांची लढाई ही मानवाच्या आंतरिक इच्छापूर्तीची राहिली नाही, तर धर्ममरतड विरुद्ध बंडखोर धुरीण अशी होत आली आहे. माणसाच्या सांस्कृतिक उन्नयनाच्या काही लाख वर्षांच्या इतिहासात होत गेलेले बदल पाहिले, तर अशा प्रकारचा निवाडा पुन्हा एकदा काही शतके तरी मागे ढकलणारा आहे, असे म्हणावे लागेल. दोन विभिन्न विचारप्रवाहांची सरमिसळ होत राहणे हे माणसाच्या मेंदुवृद्धीचे लक्षण मानले गेले. त्यामुळे धर्माचरण की आंतरिक ऊर्मी अशी नवीच लढाई जगाच्या सगळ्या भागात लढली जाऊ लागली. पृथ्वीवरील मानवी संस्कृती प्रगत होत गेली, तसतशी ती एकमेकांचे स्वातंत्र्य जपण्यासच प्राधान्य देत आली. 'तुझे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी मी अधिक प्रयत्नशील राहीन' हा संस्कृतीचा आविष्कार ठरला. परंतु सत्ता या कल्पनेचा उगम त्याही आधीचा आणि ती संकल्पना संस्कृतीचे संस्कार स्वीकारतेच असे नाही. त्यामुळे 'माझे ते माझे आणि तुझे तेही माझे' यासाठी हमरीतुमरी सुरू झाली. त्यातूनच धर्मसत्ता आणि राजसत्ता यांना खतपाणी मिळत गेले.अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयामागे गेल्या काही दशकांत मुस्लिमांकडून हिंदू मुलींचे होत असलेले अपहरण आणि त्यामागील धर्मवृद्धीची कल्पना याचा संदर्भ आहे. अशा प्रकारच्या घटनांसाठी 'लव्ह जिहाद' ही संकल्पना रुजवण्यात आली. प्रत्येक आंतरधर्मीय विवाहात सक्ती आणि बलप्रयोगच असतो, असे या संकल्पनेचे गृहीतक आहे. ते सर्वथा चुकीचे आहे किंवा नाही, याविषयी सार्वत्रिक पातळीवर चर्चा करण्याची कुणाची तयारी नाही. परंतु 'हे असेच असते,' असे ठामपणे म्हणणाऱ्यांना केवळ बहुसंख्यांचे पाठबळ मात्र दिसते. परंतु बहुसंख्य म्हणतात किंवा मानतात ते बरोबर आणि त्याचे पालन हीच समाजसंस्कृती असे मानणे हे समाजरचनेचा वैचारिक आधारच नाकारणारे आहे. भौतिक प्रगतीबरोबर माणसाच्या विचारविश्वातही खूप त्सुनामी आल्या. त्यांना परतवून लावताना संख्येने मूठभरच, परंतु विचारसमृद्ध असलेल्या माणसांची कमालीची दमछाकही झाली. तरीही प्रयत्न मात्र थांबले नाहीत. परिणामी, मानवी समूहातील वैचारिक धारणांमध्ये हळूहळू कालसुसंगत बदल होत गेले, असे इतिहास सांगतो. तो मान्य करायचा, तर प्रत्येकाला स्वतंत्रपणे विचार करण्याची आणि त्याच्याशी इमान राखण्याची मुभा असायलाच हवी. स्त्री आणि पुरुष यांच्यातच विवाह होऊ शकतो या कठोर चौकटीपासून समलिंगी विवाहास मान्यता देण्यापर्यंतचा प्रवास सहजसोपा निश्चितच नव्हता. म्हणूनच प्रत्येक विवाह हा धार्मिक चालीरीतींशीच निगडित असायला हवा, असे म्हणणे म्हणजे पुन्हा एकदा भूतकाळात जाण्यासारखे. 'लव्ह जिहाद' या कल्पनेत नेमके हेच अनुस्यूत दिसते. घटनेने दिलेले विचार आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य मान्य करायचे, तर अशा प्रत्येक विवाहात कोणीतरी कोणावर तरी सक्तीच केली आहे, असे मानणे सर्वथा चुकीचे. आईवडिलांनी ठरवून दिलेल्या मुलाशीच विवाह करण्याची संस्कृती जवळजवळ नामशेष होत आली असली, तरी तिचे भग्नावशेष अजूनही असे डोके वर काढतातच.एकाच धर्मातील विवाह पद्धतींबाबतही अनेक कठोर नियमांचे पालन होण्याची सक्ती वैचारिक क्रांतीनंतरच्या काळात सैलावत गेली. परंतु तरीही ती 'कोणतीही मुलगी आण, पण परधर्मातील नको' येथपर्यंतच येऊन थांबली. त्यालाही छेद द्याल तर दोन्ही धर्मातील बहुसंख्यांच्या रोषाला बळी पडाल, अशी रचना वैयक्तिक आणि सांस्कृतिक विकासापासून माणसाला वंचित करणारीच ठरते. कोणाशी संसार करायचा, हे ठरवण्याचा अधिकारही केवळ धर्माच्या आधारावर हिरावून घेणे हे अधिक धोक्याचे. अर्थात आजही संसार करणाऱ्या दोघांपैकी कुणीही एकमेकांवर सक्तीचा आरोप करून न्यायालयाचे दरवाजे ठोठावू शकतेच. हे केवळ भिन्न धर्मीयच नव्हे, तर एकाच धर्मातील, अगदी जात- पोटजात पाहून केलेल्या विवाहांतही घडतेच. कुटुंब न्यायालयात प्रचंड संख्येने दाखल होत असलेल्या तक्रारींवरून तर हे स्पष्टच होते. तरीही राजसत्तेने अशा व्यवहारांमध्ये नाक खुपसून विभिन्न धर्मातील स्त्री-पुरुषांनी केवळ विवाहासाठी धर्मातर करण्यास बंदी घालणारे कायदे करणे, हे राज्यघटनेतील स्वातंत्र्याच्या चौकटीत कसे काय बसू शकते? उत्तर प्रदेश, हरियाणा, कर्नाटक यासारख्या राज्यांमध्ये अशा प्रकारचे कायदे अमलात आणण्याची तयारी सुरू आहे. हा प्रयत्न एक प्रकारे, धर्माभिमानी आग्रहांना राज्यघटनेच्या चौकटीत कोंबण्याचा. तो तांत्रिकदृष्टय़ा- विधानसभांतील संख्याबळामुळे- यशस्वी होईलही. पण त्याने सांस्कृतिक विकासाचा कोणता टप्पा आपण गाठणार आहोत? व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर करणे, व्यक्तींना निवडीचे स्वातंत्र्य देणे हे मूल्य गेल्या दोनशे वर्षांत जगभर डोळसपणे स्वीकारले गेले. धर्म बुडतो अशी आवई उठवून या निवडस्वातंत्र्याचा छुपा अव्हेर करणे, त्यासाठी या मूल्यावरच 'पाश्चात्त्य' असा शिक्का मारणे, हे आपलाच खुजेपणा दाखवणारे. त्याने कदाचित बहुसंख्याक समाजाचा तात्कालिक फायदा होईल, त्यातून राजकीय सत्तेलाही अधिक बळ मिळेल वगैरे ठीक. पण मानवी प्रयत्नांवर विश्वास ठेवून विज्ञानाला वाव देण्यासाठी निवडस्वातंत्र्याचे मूल्य महत्त्वाचे मानणारी जी संस्कृती मानवसमाजाने जोपासली, तिच्या पुढे न जाता उलट तिच्याशी तात्कालिक फायद्यासाठी आणि निव्वळ एखाद्या- किंवा जन्माने दिलेल्या- धर्माच्या भल्यासाठी आपण आपल्याच प्रगत संस्कृतीशी धर्मयुद्ध पुकारण्यात काय हशील आहे?

## नोकरीचे आमिष दाखवून बँक खात्याची माहिती व येणाऱ्या ओ.टी.पी प्राप्त करून पैसे लुबाडणाऱ्या टोळीला पंत नगर पोलीस ठाणे यांनी केली गजाआड

नोकरीचे आमिष दाखवून बँक खात्याची माहिती विचारून येणारे ओटीपी नंबर मिळवून पैसे लुबाडणारे टोळीला पंत नगर पोलीसांकडून अटक करण्यात आली. घाटकोपर येथे राहणारी श्रीमती.वैशाली सचिन मेहता यांनी www.shine.com या फोन ॲप वर आपला रिझ्युम अपलोड केला.

या ॲप मध्ये काम करीत असलेला विराज नामक व्यक्ती मोबाईल द्वारे वैशाली यांना संपर्क साधून त्यांने shine.com मध्ये बोलावून वैशाली मेहताचा विश्वास जिंकून सुरुवातीला १०/-रुपये डेबिट होतील असे सांगून बँक खाते डेबिट कार्ड आणि ओ.टी.पी क्रमांक मिळवून ३१/०८/२०२० रोजी ते ३/९/२०२० या तारखेत येणाऱ्या ओ.टी.पी क्रमांकाची मागणी करून वैशालीच्या बँक खात्यातून एकूण ८,१६,५९६ इतकी रक्कम लुबाडली. त्यामुळे आरोपी विराज विरोधात वैशाली मेहताने पंतनगर पोलीस ठाण्यात दिनांक. ७/९/२०२० रोजी गुन्हा दाखल केला.

गुन्हेगारांचा शोध घेताना आरोपीने वापरलेल्या मोबाईल क्रमांक आणि पेटीएम वॉलेट चा आढावा करून तांत्रिक माहिती च्या साह्याने आरोपी बाबत माहिती प्राप्त केली.

आरोपी दिल्ली येथे असल्याचे समजल्यावर माननीय पोलीस सहाय्यक आयुक्त (का व सु ) यांचा लेखी परवाना घेऊन व मार्गदर्शनानुसार पंत पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल माळी सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबासाहेब मिसाळ व पोलीस पथकाने संशयित आरोपीचा शोध व तपास दिल्ली येथे जाऊन केला.

आरोपी चालवत असलेल्या बोगस कॉल सेंटरवर पोलीसांनी छापा टाकून ४ आरोपींना ताब्यात घेतले आणि अन्य साथीदार यांना बरौत, उत्तर प्रदेश येथून ताब्यात घेतले. सदर गुन्ह्यात आरोपी नामे १) आशिक इक्बाल मोहम्मद नजरूल हसन (वय२०) २)राहुल तिलक राज (वय २१) ३)रवी टोकला (वय २४) ४)देवेश कुमार सिंह (वय २३) यांच्या कडून तब्बल ८ हार्ड डिक्स, २३ मोबाईल, ४७ सिम कार्ड, १२ डेबिट कार्ड, ११ पेटीएम कार्ड, ७ डोंगल व ३ सीडी, २ पॅन कार्ड एक वाहन चालक परवाना तसेच ५२ सिमकार्डचे केस कव्हर एक KECHAOOA, KYES कंपनीची मोबाईल बॅटरी व रोख रक्कम १,७४,०००/- रु. ताब्यात घेण्यात आले.सदर कामगिरीही माननीय पोलीस सहायक आयुक्त ( का व सु), श्री. विश्वास नागरे पाटील, माननीय अपर पोलीस आयुक्त (पु.प्रा.वि.) श्री संजय दराडे, माननीय पोलीस उप आयुक्त ( परिमंडळ-७) श्री.प्रशांत कदम, माननीय सहायक पोलीस आयुक्त श्री.कुंडलिक निगडे, माननीय वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंतनगर पोलीस ठाणे श्री.सुहास कांबळे , यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (का व सू), सहायक पोलीस निरीक्षक अमोल माळी, सहायक पोलीस निरीक्षक बाबासाहेब मिसाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

## एसटी कर्मचाऱ्यांना तासाभरात मिळणार पगार, अनिल परब यांची घोषणा

राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या आत्महत्येमुळे राज्यात खळबळ उडाली आहे. अखेर महामंडळाकडून तातडीने एसटी कर्मचाऱ्यांना एक महिन्याचं वेतन आणि दिवाळी अग्रीम रक्कम आज दिली जाणार आहे, अशी घोषणा खुद्द परिवहन मंत्री अनिल परब यांनी केली आहे. अनिल परब यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन एसटी कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्वी महिन्याभराचे वेतन देण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. 'पुढील तासाभरात एसटी कर्मचाऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होणार आहे. उरलेले थकीत वेतन हे लवकरच कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा होईल, त्यासाठी कर्ज घेण्याची प्रक्रिया सुरू आहे', असंही परब यांनी स्पष्ट केले.

'एसटी कर्मचाऱ्यांनी आत्महत्या सारखे कठोर पाऊल उचलू नये. तात्पुरत्या संकटातून आपण नक्की मार्ग काढू. पण दुःखी होऊन असे कोणतेही टोकाचं पाऊल उचलू नये. तुमच्या या निर्णयामुळे कुटुंबाला त्याचा त्रास होतो. कुटुंब रस्त्यावर येत असते, त्यामुळे कृपया करून असे पाऊल उचलू नका', असं आवाहनही परब यांनी सर्व कर्मचाऱ्यांना केले.

'एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणीत सापडले आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी बँकेकडे कर्ज पण मागितले आहे. टप्प्या- टप्प्याने सगळ्या गोष्टी होतील. राज्य शासनाकडेही पैसे मागितले आहे. याबद्दल मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी बोलणे झाले आहे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत बोलणं सुरू आहे. आता एसटीसाठी कोणतीही रक्कम थकीत नाही. राज्य शासनाला प्रस्ताव दिला असून काही दिवस तरी कर्मचाऱ्यांना पगार द्यावे', अशी मागणीही परब यांनी केली आहे.

जळगावात एसटी कंडक्टरची आत्महत्या कोरोनाच्या काळापासून एसटी मंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न गंभीर बनला आहे. अनेकांना चार महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने आर्थिक परिस्थिती ढासळली असल्याचे पाहायला मिळत आहे. जळगाव जिल्ह्यातील रायपूर कुसुम्बा गावातील रहिवासी असलेले आणि एस मंडळात वाहक पदावर काम करत असलेल्या मनोज चौधरी यांनी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

मागील काही महिन्यापासून एसटी कर्मचाऱ्यांना पगार मिळत नसल्याने एसटी वाहक-चालकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. एसटी महामंडळामध्ये गेले तीन चार महिने पगार मिळत नसल्याने मनोज चौधरी कर्जबाजारी झाला होता. त्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केल्याची माहिती मयत मनोज चौधरीच्या वडिलांनी दिली आहे.

## राज्यात विक्रमी रुग्णांनी केली 'कोरोना'वर मात, मार्केटमध्ये गर्दी वाढल्याने सरकारला चिंता



राज्यात रविवारी विक्रमी 8 हजार 232 रुग्णांनी कोरोनावर मात केली. तर 5 हजार 92 नवे रुग्ण आढळून आलेत. राज्यात कोरोनातून बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या ही आता 15 लाख 77 हजारांवर गेली आहे. तर राज्याचा हा 91.71 एवढा झाला आहे. दिवाळीला 8 दिवस राहिलेले असताना सध्या बाजारपेठांमध्ये गर्दी वाढली आहे. या गर्दीमुळे सरकारची चिंता वाढली असून कोरोना व्हायरसने पुन्हा डोकं वर काढू नये म्हणून उपयोजना काय करता येतील याचा विचार सुरू केला आहे. राज्यात दिवसभरात 110 कोरोनाबाधित रुग्णांचा मृत्यू झाला. राज्याचा मृत्यू दर हा 2.63 एवढा झाला आहे. राज्यातल्या उपचार सुरू असलेल्या रुग्णांची संख्या ही आता लाखाच्याही खाली आली असून राज्यभरात सध्या 96 हजार 372 रुग्णांवर उपचार सुरू आहेत. महाराष्ट्रात गेल्या महिनाभरापासून सातत्याने कोरोनाचा आलेख कमी होतोय. त्यामुळे सगळ्यांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकार आणि स्थानिका पालिकांनी मिळून जे सातत्याने काम केलं त्यामुळे हा आलेख घसरत असून त्याची 5 महत्त्वाची कारणं सांगितली जात आहेत. राज्य सरकार मोठ्या प्रमाणावर टेस्टिंग केल्यामुळे कोरोना रुग्णांना तातडीने उपचार मिळाले. त्यामुळे प्रसार रोखला गेला. आरोग्य यंत्रणा नुसती टेस्टिंगच करून थांबली नाही तर कोविड रुग्णांच्या संपर्कात येणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांनी त्या माणसांना आयसेलोट केलं. त्यामुळे प्रसार रोखण्यात मदत झाली.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार १० ते १६ नोव्हेंबर-२०२०


## फुटपाथवर झोपलेल्या 1 वर्षाच्या बालिकेचे अपहरण ! चारकोप पोलीस ठाणे कडून 4 आरोपींना अटक.



मालवणी, मालाड (पश्चिम) येथे राहणाऱ्या श्रीमती सुनिता गुरव( वय ३०) धंदा- घरकाम या २/११/२०२० रोजी रात्री ९:०० वा भुमी पार्क फेस-५ सोसायटी ऑफिसबाहेर फूटपाथवर पती व तिच्या मुलांसह झोपले होते. मध्यरात्री 3 30 च्या दरम्यान सुनिता गुरव यांना जाग आली तेव्हा त्यांची एक वर्षाची मुलगी बबीता दिसून आली नाही म्हणून सुनीता व त्यांच्या पतीसोबत मुलीचा जवळच्या परिसरात शोध घेतला परंतु मुलगी कुठे न सापडल्यामुळे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने कायदेशीर रखवाली तुन पळवून नेले असावे अशी खात्री सूनिता गुरव यांना झाली. त्यामुळे सुनीता गुरव यांनी चारकोप पोलिस ठाण्यात जाऊन मुलगी बेपत्ता असल्याची फिर्याद दिली. सदर गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा व संवेदनशील असल्यामुळे तात्काळ वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपासासाठी पोलीस ठाण्यातील ३ पथकांची नेमणूक करण्यात आली. पथकामार्फत आजूबाजूच्या परिसरात मुलीचा शोध घेण्यात आला. सुनिता गुरव यांची मुलगी बबीता अत्यंत लहान असल्याने आणि बोलू शकत नसल्या कारणाने , हा गुन्हा गुंतागुंती स्वरूपाचा होता. म्हणून घटनास्थळावरील आणि जवळच्या परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज तपासण्यात आली. तांत्रिक तपास आणि गुप्त बातमीदार्यांच्या मदतीने अवघ्या २ तासात अपर्हीत १ वर्षाची बबीता अंधेरी परिसरातून महिला आरोपीकडून सुखरूप ताब्यात घेण्यात आली.या गुन्ह्यात सचिन रेल्वे (वय ४०), सुप्रिया येलवे (वय ३५), रश्मी पवार (वय २९) आणि राजू पवार (वय ३६) यांना ताब्यात घेऊन गु.र.क्र. ८७५/२०२० कलम ३६३ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. सदर होण्याची कारवाई माननीय अप्पर पोलीस आयुक्त उत्तर प्रादेशिक विभाग, श्री. दिलीप सावंत यांच्या आदेशानुसार पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-११)श्री. विलास ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. दिलीप यादव , वरिष्ठ पोलीस निरीक्षक चारकोप पोलीस ठाणे श्री.विठ्ठल शिंदे , पोलीस निरीक्षक. लांगी, सहाय्यक पोलीस निरीक्षक.वाघमारे , पोलीस उप निरीक्षक. ढेंबरे आणि स्टाफ यांचे विशेष पथक तयार केले होते

## पिस्तुलाची धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या गुन्हेगाराला रबाळे पोलीस ठाण्याने 3 तासात केले गजाआड

अपहरण करून जिवे ठार मारण्याची धमकी देऊन घरात घुसून त्याच घराची चोरी करणारा आरोपी नामे.सागर ढोणे (वय ३२) राहायला- गोवंडी, मुंबई याला तब्बल ३ तासात रबाळे पोलीस ठाणे यांनी अटक केली. आरोपी सागर ढोणे हा गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असल्यामुळे त्याच्या विरोधात याआधी मानखुर्द गोवंडी, देवनार इत्यादी पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे नोंद आहेत.दिनांक. ३०/१०/२०२० रोजी रबाळे पोलीस ठाण्यात गुन्ह्यातील फिर्यादी यांनी तक्रार केली की, सागर ढोणे नामक व्यक्ती याने घेतलेले पैसे न देता फिर्यादीच्या घरात घुसून पिस्तुलचा धाक दाखवून कपाटातील २०,०००/- रुपये रोख रक्कम मोबाईल आणि संगणक जबरदस्तीने घेऊन गेला आणि फिर्यादीला जाताना जर पोलीसात तक्रार केली तर जीवे मारेन अशी धमकी दिली.त्यामुळे याबाबत रबाळे पोलीस ठाणे गु.र.नंबर ३१७/२० भा.द.वि. ३९२, ४५१, ३४ सह शस्त्र कायदा ३,२५ प्रमाणे नोंद करण्यात आली. त्याच दिवशी दुसऱ्या फिर्यादीला सागर ढोणे यांनी पूर्वी झालेल्या



भांडणाचे कारण काढून फिर्यादी यांना पिस्तुलचा धाक दाखवून जिवंत मारण्याची धमकी देऊन इतर साथीदारांच्या मदतीने इको कार मध्ये फिर्यादीला जबरदस्ती बसून मुंब्रा येथे घेऊन गेला आणि पिस्तुल व चाकू दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. मुंब्रा येथे जेव्हा गाडी थांबली तेव्हा फिर्यादी ने सागर धुणे आणि त्याच्या साथीदारांची नजर चुकवून तिथून पळ काढला आणि त्याच्या विरोधात रबाळे पोलीस ठाण्यात तक्रार केली.

त्यामुळे आरोपीविरुद्ध दुसऱ्यांदा रबाळे पोलीस ठाणे गु.र.नं.३१६/२०२० भा.द.वि कलम ३६५, ५०६(२), ३४ सह शस्त्र कायदा ३,४,२५ अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आला.सदर घडलेले दोन्ही गुन्हे हे गांभीर्य स्वरूपाचे असल्याचे लक्षात घेऊन रबाळे पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुप्त बातमीदारांच्या सहाय्याने माहिती काढून सागर ढोणेला शिवाजी नगर गोवंडी,मुंबई येथून ताब्यात घेऊन केलेल्या गुन्ह्यात अटक केली. आरोपी सागर ढोणे कडून १ देशी कट्टा, १ चाकू, १ कम्प्युटर सीपीयू, १ एलसीडी मॉनिटर आणि १ मोबाईल फोन ताब्यात घेण्यात आले.सदर गुन्ह्याची कामगिरी ही माननीय पोलीस आयुक्त श्री.बिपिन कुमार सिंह, माननीय पोलिस आयुक्त. डॉ. विजय जाधव, माननीय पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१) श्री. सुरेश मेंगडे व माननीय सहाय्यक पोलीस आयुक्त वाशी विभाग श्री. विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.योगेश गावडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.उमेश गवळी, सहाय्यक पोलीस निरीक्षक.अंकुश चिंतामण, पोलीस उपनिरीक्षक.अमित शेलार यांनी पार पाडली.

## चिपळुणात 26 लाखांचा गुटखा जप्त, तीन जणांना अटक

चिपळूण : शहरातील खाटीक आळी परिसरात मटण मार्केटजवळ असलेल्या नजराणा इमारतीच्या खाली गुटख्याने भरलेली मारुती इको व आयशर टेम्पो ही दोन्ही वाहने शुक्रवारी दुपारी काही नागरिकांनी पकडली आणि पोलिसांच्या ताब्यात दिली. त्यानंतर पोलिसांनी तीन गुटखा बहाद्दरांच्या मुसक्या आवळून त्यांना ताब्यात घेतले. गुटखा आणि दोन वाहनांसह सुमारे २६ लाखांपेक्षा जास्त मुद्देमाल जप्त केला. या संशयितांना तीन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी दशरथ बांबळे यांनी चिपळूण पोलीस स्थानकात रात्री उशिरा तक्रार दिली. त्यानुसार आरोपी मुश्ताक कच्छी (रा. चिपळूण), अंकुश केसरकर व संदीप पाटील (दोघेही रा. सावंतवाडी) यांनी आपल्या ताब्यातील दोन्ही वाहनांमध्ये शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधी सुपारी, पान मसाला भरुन



वाहने उभी करुन ठेवली होती. याबाबत जागरुक नागरिकांनी पोलिसांना माहिती देताच त्यांनी घटनास्थळी येत वाहनांची तपासणी केली असता, वाहनांमध्ये गुटखा असल्याचे निदर्शनाला आले.याबाबत संबंधित वाहनधारकांकडे चौकशी केली असता, त्यांनी पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलीस खाक्या दाखवताच हा गुटखा इतर ठिकाणी विक्रीसाठी नेत असल्याची कबुली दिली. याबाबत चिपळूण पोलीस स्थानकात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. मोहितकुमार गर्ग, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी सदाशिव वाघमारे, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे, उपनिरीक्षक समद बेग, पोलीस नाईक आशिष भालेकर, पंकज पडेलकर, नाईक आदिती जाधव यांनी केली.

## अंधेरी-घाटकोपर जंक्शन उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला

पूर्व द्रुतगती महामार्गावरील अंधेरी-घाटकोपर जंक्शनवर नव्याने बांधण्यात आलेल्या दक्षिण दिशेच्या उड्डाणपुलाचे उद्घाटन आज करण्यात आले. पर्यावरण आणि पर्यटन मंत्री तसेच मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आदित्य ठाकरे, नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या उड्डाणपूलाचे लोकार्पण करण्यात आले. अंधेरी घाटकोपर या जंक्शनवरील गर्दी कमी करण्यासाठी तसेच मुंबई व घाटकोपरकडे जाणारी वाहतूक वेगळी करण्यासाठी १२ मीटर रुंदीचा हा उड्डाणपूल प्रस्तावीत करण्यात आला होता. मुंबईहून ठाण्याकडे जाणाऱ्या प्रवाशांना तीन लेन उड्डाणपूल होता, तथापी, त्यांना अंधेरी-घाटकोपर जंक्शनवर मोठ्या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे वाहतुकीची ही कोंडी सोडवण्यासाठी एमएमआरडीएने (मुंबईच्या दिशेने) तीन लेन नवीन उड्डाणपुलाचे काम सुरू केले. आता नव्याने तयार केलेला उड्डाणपूल वाहतुकीसाठी आजपासून खुला झाल्याने आता प्रवाशांना दोन्ही दिशेने सुरळीत व सुरक्षित वाहतुकीचा अनुभव घेता येईल. यामुळे ठाण्याहून मुंबईला जाण्यासाठी चांगली कनेक्टिव्हीटी मिळणार आहे. उड्डाणपुलाचे काम मेसर्स एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. आणि मेसर्स काशेक इंजिनिअर्स प्रा. लि. यांना देण्यात आले होते. निविदेची किंमत ही ३३.०४ कोटी रुपये होती. उड्डाणपुलाची एकूण रुंदी १२ मीटर आणि लांबी ६९३ मीटर आहे. उड्डाणपुलाच्या सुपरस्ट्रक्चरमध्ये स्टील गर्डर, आरसीसी स्लॅब आणि पीएससी – १ गर्डरचा टिपिकल स्पॅन आरसीसी डेकस्लॅब



ऑब्लिगेटरी स्पॅनशी एकत्रित आहे. एमएमआरडीएच्या माहितीनुसार या प्रकल्पातून कुशल कामगारांसाठी एकूण ३० हजार ०३६ मनुष्यदिवस तर अकुशल कामगारांसाठी ३६ हजार ८७५ मनुष्यदिवस रोजगाराची निर्मिती झाली. या प्रकल्पातून कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या वेतनावर सुमारे १२.८ कोटी रुपये खर्च झाले. हा उड्डाणपूल आज वाहतुकीसाठी खुला होत असल्यामुळे एमएमआरडीएमार्फत महानगरातील वाहतुकीच्या सुलभतेमध्ये अजून एक महत्वाचे योगदान दिले जात आहे. पूर्व द्रुतगती महामार्गावरील विद्यमान अंधेरी-घाटकोपर जंक्शन हे सर्वात जास्त वाहतुकीच्या वर्दळीच्या स्थानापैकी एक होते. या नवीन उड्डाणपुलामुळे वाहतूक विभागली जाईल आणि त्यामुळे जंक्शनवरील वाहतुकीची वर्दळ आणि कोंडी कमी होईल, असे एमएमआरडीएचे महानगर आयुक्त आर. ए. राजीव म्हणाले. "प्रवाशांना सुलभ आणि सुरक्षित ड्राइव्ह करण्यासाठी दररोज हा उड्डाणपूल व्यापकपणे वापरला जाईल. यामुळे वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊन वाहनचालकांना मोठा दिलासा मिळेल असा विश्वास आहे. एकुण ६९३ मीटर लांबीचा हा उड्डाणपूल ३३.०४ कोटी रुपये किमतीमध्ये पूर्ण करण्यात आला. कोविड साथीच्या काळात अनेक अडचणी येत असतानाही एमएमआरडीए टीम आणि नियुक्त कंत्राटदाराने समर्पणाने केलेल्या कामाचे हे प्रतीक आहे.

## चोरीच्या मोबाइलबद्दल मित्राला जाब विचारणे महागात, काय घडलं वाचा!



पुणे: चोरीचा मोबाइल पोलिसांकडे जमा करण्यास सांगण्यासाठी घरी गेलेल्या व्यक्तीवर मित्राने चाकूने वार केल्याची धक्कादायक घटना बिबवेवाडी परिसरात घडली. या प्रकरणी बिबवेवाडी पोलिस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे.सौरभ भगत (वय २१, रा. मोरे वस्ती, सहकारनगर), अजय प्रजापती (२०, रा. सुखसागरनगर, कोंढवा) अशी अटक केलेल्या दोघांची नावे आहेत. या घटनेत सूरज कामथे (२९, रा. धनकवडी) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून बिबवेवाडी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी व तक्रारदार ओळखीचे आहेत. तक्रारदार यांनी त्यांचे सिमकार्ड आरोपीला वापरण्यासाठी दिले होते.आरोपीने ते सिमकार्ड वापरून तक्रारदारांना परत दिले. त्यानंतर तक्रारदारांना पुणे ग्रामीणमधील राजगड पोलिसांचा फोन आला. त्यांच्या नावाचे सिमकार्ड टाकलेला मोबाइल चोरीला असल्याचे सांगून तो पोलिस ठाण्यात आणून जमा करण्याची सूचना पोलिसांनी त्यांना केली. याबाबत विचारणेसाठी कामथे आरोपीच्या घरी गेल्यावर त्याचा राग मनात धरून आरोपीने चाकूने कामथेंना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी तक्रारदारांनी पोलिसांकडे उपचार घेऊन तक्रार दिल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.


( मुंबई पब्लीक ट्रस्ट कायदा 1950 नुसार रजिस्टर रजि.न.ई/7482/ठाणे 11-04-2012 ) प्राप्तीकर कायदा 1961 च्या 80G अंतर्गत र सवलतीस पात्र )
THN/C.I.T.-I/Tech.1/12A/32/2013-14 w.e.f 10/12/2012 THN/C.I.T-I/Tech.1/80G/36/2013-14 w.e.f 10/12/2012
www.asraytrust.com Email : asraytrust2012@gmail.com

आश्रय ट्रस्ट

सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक

कला, साहित्य, सांस्कृतिक, शैक्षणिक व वैद्याकिय क्षेत्राला वाहून घेतलेली पंजीकृत संस्था

NITI AAYOG UNIQUE ID : MH/2018/0196753

संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक



5 राजाराम अपार्टमेंट, नवघर रोड, भाईंदर ( पूर्व ), ठाणे. 401105
9594418181 / 8424989898 / 9664966499 / 7400001474


## पिंपरी- पोलिसाचा मॉर्फ केलेला अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

पिंपरी : पोलिस कर्मचाऱ्याचा चेहरा मॉर्फ करून अश्लील व्हिडिओ तयार करून नंतर फेसबुकवरून तो सर्व मित्रांना पाठविल्याचा धक्कादायक प्रकार पिंपरी-चिंचवडमध्ये उघडकीस आला आहे. सोशल मीडियाद्वारे पोलिसांची प्रतिमा मलीन करणाऱ्याचा प्रयत्न रोखणार कसा, असा प्रश्न या निमित्ताने उभा ठाकला आहे.यापूर्वी पोलिस आयुक्त कृष्ण प्रकाश यांच्या नावाने बनावट अकांउट काढून पैसे मागण्याचा प्रकार घडला होता. त्यानंतर एका फौजदाराबाबत आणि गुन्हे शाखेतील सहायक निरीक्षकाबाबतही असाच प्रकार घडला आहे. या सर्व प्रकारांत आतापर्यंत केवळ गुन्हे दाखल झाले आहेत.पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयातील एका पोलिस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्याचा फोटो मॉर्फ करून अश्लील व्हिडिओ बनविण्यात आला आहे. त्यानंतर बनावट फेसबुक अकाउंटच्या माध्यमातून तो संबंधित पोलिसाच्या फ्रेंडलिस्टमधील अनेकांना पाठविण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. यामध्ये अनेक पोलिसांसह सर्वसामान्य नागरिकांचाही समावेश आहे. त्यानंतर काही नागरिकांनी संबंधित पोलिस कर्मचाऱ्याशी संपर्क साधून याबाबतची तक्रार दाखल केली आहे. तसेच, संबंधित पोलिसाने त्याच्या फेसबुक अकाउंटवरूनच सर्वांना असा प्रकार घडल्याची माहिती देऊन सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.फेसबुकवरील फोटो आणि माहिती घेऊन बनावट अकाउंट तयार केले जात आहे. त्यानंतर मूळ फेसबुक अकाउंटवरील फ्रेंडलिस्टमधील सर्वांना नव्याने सुरू करण्यात आलेल्या बनावट अकाउंटवरून फ्रेंड रिक्वेस्ट पाठविली जाते. हे केल्यावर मेसेंजरच्या माध्यमातून पैशांची मागणी केली जात आहे. बऱ्याच वेळा पैसे मागण्यासाठी हिंदी भाषेतून संवाद साधला जात असल्याचे आढळून आले आहे. तर, काहींना इंग्रजीमधून मेसेज पाठवून पैशांची मागणी केली जात आहे. काही दिवसांपूर्वी पिंपरी-चिंचवडच्या पोलिस आयुक्तांच्या नावाने बनावट अकाउंट काढून पैसे मागण्यात आले होते. त्याचा अद्याप ठावठिकाणा लागलेला नाही. पोलिसांनी बनावट अकांउट बंद केले. पण त्यानंतर एका फौजदाराच्या नावाने; तर काही दिवसांतच गुन्हे शाखेत कार्यरत असणाऱ्या सहायक निरीक्षकाच्या नावाने पैसे मागितल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे पोलिसांच्या बाबत असे प्रकार सातत्याने घडत असल्याने सोशल मीडियावरील माहितीचा गैरवापर रोखण्याचे



आव्हान निर्माण झाले आहे.अशी घ्या खबरदारी> फेसबुकच्या अकांउट सेटिंगमधून प्रायव्हेसी सेटिंगमध्ये आवश्यक बदल करा.> फेसबुकवर तुम्ही अपलोड केलेले फोटो, व्हिडिओ आणि अन्य माहिती कोणाकोणाला दिसायला हवी याबाबतही सेटिंग करा.> प्रोफाइल सेटिंगमध्ये 'फ्रेंन्ड्स ओन्ली' सेटिंग करता येऊ शकते. त्याबाबतची माहिती सेटिंग ऑप्शनमध्ये दिलेली असते.> शक्यतो अनोळखी लोकांची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका.> स्वतःची अथवा कुटुंबाची अतिरिक्त माहिती, फोटो, व्हिडिओ सातत्याने अपलोड करणे टाळा.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898